अंक १ : जुलै २०११

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ ॲण्ड सोशल जस्टिस, पुणे द्वारा प्रकाशित

## समजदार जोडीदार प्रकल्पाच्या माध्यमातून वैयक्तिक व गाव पातळीवर घडलेल्या बदलाच्या गोष्टी

**भागीदार संस्था : हॅल्लो मेडिकल फाऊंडेशन, अनदूर,**
**जिल्हा – सोलापूर, गाव : सांगवी खुर्द**
**ॲनिमेटर : श्री. विक्रम सोनकांबळे**

नमस्कार,

माझं नाव विक्रम सोनकांबळे, मी समजदार जोडीदार या प्रकल्पाशी एक वर्षापासून जोडलेलो आहे. या समजदार जोडीदार प्रकल्पामुळे माझ्या आयुष्यात, वागण्यात आणि विचार करण्यात जो बदल झाला आहे, त्याविषयी थोडसं मी तुम्हाला सांगणार आहे.

माझं लग्न पाच वर्षांपूर्वी झालं. लग्नानंतर काही वर्षांनी माझी पत्नी माझ्या सततच्या मारहाणीमुळं, माझ्यामुळे पत्निशी होणाऱ्या भांडणामुळं व वादाला कंटाळून ती माहेरी निघून गेली. जवळ जवळ दोन वर्षे ती माहेरी होती.

एक वर्षापूर्वी मला हॅल्लो मेडिकल फाऊंडेशन, अनदुर या संस्थेमार्फत गावात एक प्रकल्प राबविला जाणार आहे असं समजलं व या प्रकल्पामध्ये माझी ॲनिमेटर म्हणून निवड झाली. पण तरीही कामाचे नक्की स्वरूप काय आहे, ॲनिमेटर म्हणून माझी काय भूमिका आहे, हे मेंटर विलास बेतसरांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मला समजलं. स्त्री–पुरुष समानता संदर्भातील वेगवेगळ्या मुद्द्यांवरील चर्चा, माहितीमुळे मला माझी चूक समजली. महिलांवर होणारी हिंसा, अन्याय, अत्याचार, जेंडर या वरील प्रशिक्षणामुळे विचार करण्यास नवी दिशा मिळाली.

(पुढील मजकूर पान 2 वर पहा)

### प्रकल्पाचे ध्येय

**प्रकल्प कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १२५ गावांमध्ये स्त्री–पुरुष नातेसंबंध सुधारणे.**

### प्रकल्पाची उद्दिष्ट्ये

**या प्रकल्पाची तीन उद्दीष्टे खालीप्रमाणे आहेत –**

- **निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांचे प्रमाण वाढवणे**
- **प्रजनन आरोग्याच्या समस्यांमध्ये पुरुषाचा सहभाग वाढवणे**
- **महिलांवरील हिंसाचार कमी करणे.**

### प्रकल्प भागीदार संस्था, संस्था प्रमुख व कार्यक्षेत्र:

**हा प्रकल्प महाराष्ट्रातील खालील पाच भागीदार संस्थांच्या माध्यमातून १२५ गावांमध्ये राबविला जात आहे.**

| भागीदार | संस्था प्रमुख | कार्यक्षेत्र | |
|---|---|---|---|
| अस्तित्व संस्था | श्री. शहाजी गडहिरे | सोलापूर | तालुका |
| हॅलो मेडिकल फौण्डेशन | डॉ. शशिकांत अहंकारी | सोलापूर | अक्कलकोट |
| नारी समता मंच | सौ. साधनाताई दाढीच | पुणे | भोर |
| सावित्रीबाई फुळे महिला मंडळ | सौ. मनिषाताई तोकले, श्री. अशोक तांगडे | बीड | बीड |
| युवाग्राम | श्री. एच. पी. देशमुख | बीड | केज |

प्रशिक्षणानंतर मी माझ्या पत्नीला माझ्या घरी आणण्याचा निर्णय घेतला व मी माझ्या सासरवाडीला जाऊन माझा निर्णय सांगितला व माझ्याकडून झालेल्या चुकीबद्दल दिलगिरीही व्यक्त केली. माझ्या बोलण्यावर व मला होत असलेल्या पश्चातापावर विश्वास ठेवून माझ्या सासरच्या मंडळींनी माझ्या पत्नीला माझ्यासोबत पाठविले. आता आम्ही सुखाने राहत असून मी माझ्या पत्नीला घरकामामध्ये मदत करण्यास सुरुवात केली आहे. तसेच माझी जमीन मी माझ्या पत्नीच्या नावे केली आहे.

माझ्यात झालेला बदल पाहून व मी माझ्या पत्नीला सासरी जाऊन आणलेलं पाहून माझ्या शेजारील माझ्या मित्रानेही काही वर्षांपासून माहेरी राहात असलेल्या त्याच्या पत्नीलाही त्याने सासरी जाऊन परत आणलं आहे. आता ते दोघं आणि आम्ही दोघं अगदी न भांडता समाधानानं, सामंजस्यानं जीवन जगत आहोत.

---

**भागीदार संस्था : अस्तित्व समाज विकास संस्था, सांगोला**

**जिल्हा – सोलापूर, गाव : हतिद**

**ॲनिमेटर : श्री. भाऊसाहेब मेटकरी**

नमस्कार,

ही गोष्ट माझ्या हतिद गावातील आहे. गावातील एका कुटुंबातील तरुणाचे लग्न करण्याचा निर्णय त्याच्या घरातील लोकांनी घेतला. त्या मुलाचं नाव आहे प्रकाश (नाव बदलेलं आहे). प्रकाश हा पुण्यामध्ये खाजगी कंपनीत काम करतो. मागील मे महिन्याच्या एका रविवारी मुलीकडील मंडळी मुलाला पाहण्यासाठी त्याच्या घरी आली.

या कार्यक्रमाबद्दल मला गावातील युवक गटातील एका सदस्याने माहिती दिली. अशा कार्यक्रमामध्ये हुंडा देण्याघेण्याविषयी चर्चा होतेच. हे लक्षात घेऊन मी त्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो. मुलीच्या कुटुंबातील सदस्यांना मुलगा पसंत पडला. तसेच मुलालाही मुलगी आवडली. मात्र मुलीच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती खूप नाजूक होती. ते त्यात हुंडा व इतर वस्तू देखील देऊ शकत नव्हते.

त्यानंतर मी त्या मुलाच्या वडिलांना भेटून त्यांना हुंडा न घेण्याविषयी विनंती केली. तसेच कर्ज काढून दिलेल्या हुंड्यामुळे मुलीच्या कुटुंबाला लग्नानंतर सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक अडचणींची जाणीव करून दिली. एखादी गंभीर घटना किंवा अत्यावश्यक गरज उद्भवल्यावर पैशाअभावी त्या कुटुंबाची अवस्था कशी दयनीय होईल हे पटवून दिले. मुलाच्या वडिलांना माझं बोलणं पटलं. व त्यांनी मुलाच्या लग्नात मुलीकडून हुंडा न घेण्याचे ठरविले. त्याचबरोबर लग्न हे मुलीच्या घरी न करता स्वतःच्या घरी करून लग्नाचा संपूर्ण खर्च स्वतः करण्याचा निर्णय घेतला. याच बरोबर त्यांनी वचन दिले की मी माझ्या सुनेला धाकटी मुलगी मानून मरेपर्यंत तिची काळजी घेईल. आणि काही दिवसांनी मुलाच्या वडिलांनी दिलेल्या वचनाप्रमाणे दोघांचं लग्न स्वतःच्या घरी स्वखर्चाने, हुंडा न घेता केलं.

**भागीदार संस्था : युवाग्राम विकास मंडळ, केज**

**गाव : गांजी**

**ॲनिमेटर : फुलचंद मनोहर जाधव**

मला पूर्वीपासून समाजासाठी काहीतरी करण्याची आवड होती. पूर्वी मी सेवाभावी संस्थेत काम करायचो. नंतर जेव्हा स्त्री–पुरुषांचे समानतेमध्ये युवक व पुरुषांचा सहभाग वाढविण्यासाठी काम करत असलेल्या युवाग्राम या सामाजिक संस्थेमार्फत मी या कार्यक्रमात आलो तेव्हापासून गावात घडणाऱ्या घटनांकडे बारकाईने लक्ष देऊन पाहण्याची सवय लागली. त्यामुळे गावात कुठेही भांडणतंटा होत असल्यास अशा घटनांमध्ये मी हस्तक्षेप करून भांडणतंटा सोडविण्याचा प्रयत्न करू लागलो.

असेच एके दिवशी आमच्या गावात पति–पत्निमध्ये काही कारणामुळे भांडण सुरू झाले होते. भांडणाचे कारण म्हणजे त्या पुरुषाच्या पहिल्या पत्नीला मूलबाळ होत नसल्याने त्या व्यक्तीने दुसरे लग्न केले होते. त्यामुळे पहिली पत्नी व त्याच्यात भांडण सुरू झाले होते. त्या लग्नाला सुमारे एक वर्ष होऊन गेल्यानंतर सुमारे तीन महिन्यानंतर तो आपल्या पहिल्या पत्नीला नेहमीच मारहाण करू लागला होता. एके दिवस तर त्याने कहरच केला बायकोला बेदम मारलेच शिवाय मारत असताना तिच्या अंगावरची साडीदेखील त्याने काढून टाकली. नवराबायकोचे भांडण असल्यामुळे सर्व लोक कुणीही मध्ये पडायला तयार नव्हते. मात्र एखाद्या गारुड्याचा खेळ पहावा असे ते भांडण पाहात होते. भांडण सोडविण्यास कोणीही पुढाकार घेत नसल्यामुळे मी ते भांडण सोडविण्यासाठी मध्ये पडलो. पण त्या व्यक्तीने मलाही मारहाण केली. शिवाय 'तुला काय करायचे माझ्या भांडणात पडून? तुलाही बघून घेईन.' अशी धमकीही मला त्याने दिली.

त्यानंतर त्या नवऱ्याचा मार खाल्लेल्या बाईने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तिच्या पतीविरुद्ध मारहाण करतो म्हणून तक्रार दाखल केली. मारहाणीचा साक्षीदार म्हणून मला न विचारता तिने माझे नाव दिले.

त्या बाईच्या पतीला जेव्हा हे कळाले तेव्हा तो माझ्याकडे आला व मला विचारता झाला, 'तुम्ही साक्ष देणार का?'

त्याला भिती होती की भांडण सोडविताना त्याने मलाही मारहाण केली होती त्यामुळे कदाचित मीही त्याच्या विरोधात साक्ष देईन.

मी त्याला म्हटलं, 'मी तुझ्या विरोधात शंभर टक्के साक्ष देणार आहे.'

हे ऐकल्यावर तो फार घाबरून गेला. बराच विचार करून त्याने तडजोडीचा मुद्दा समोर ठेवला. मारहाण केलेल्या पत्नीबरोबर सामंजस्य करण्यास तयार झाला. त्याने त्याच्याजवळ असलेल्या ६ एकर शेतीपैकी ३ एकर शेती त्या बायकोच्या नावे करून दिली. शिवाय राहण्यासाठी एक खोलीसुद्धा दिली.

आता ती बाई गावामध्ये मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवित आहे.

मला ती बाई एके दिवस म्हणाली, 'तुम्ही जर त्या दिवशी भांडणात

(पुढील पान ३ पहा)

मध्ये पडला नसता तर माझा नवरा मला रोज असाच मारत राहिला असता, पण आता त्यातून माझी सुटका झाली आहे आणि आता मी फार सुखी आहे.'

अशा प्रकारे आमच्या गावात घडलेल्या घटनेत मध्यस्थी करण्याचे धाडस मला या प्रकल्पामुळे मिळाले.

---

**भागीदार संस्था : युवाग्राम विकास मंडळ, केज**

**गाव : भोपला**

**ॲनिमेटर : लक्ष्मण भारत हजारे**

मला शालेय जीवनापासूनच सामाजिक कार्य करण्याची आवड होती. सतत लहानमोठ्या सामाजिक अडचणी किंवा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असे. मला नेहमी वाटायचं गावातील अडचणी सोडविण्यासाठी वेळ द्यावा.

काही दिवसांनी मला अशी चांगली संधी मिळाली. आणि ती म्हणजे युवाग्राम या सामाजिक संस्थेमार्फत आमच्या गावात राबविल्या जात असणाऱ्या स्त्री-पुरुष समानता या प्रकल्पात माझी गाव कार्यकर्ता म्हणून निवड करण्यात आली.

परंतु या प्रकल्पात ॲनिमेटर म्हणून काम करताना खूप अडचणी आल्या. आणि त्यातील काही अडचणी चांगल्या प्रकारे सोडविण्याचा प्रयत्नही केला.

माझ्या गावात एक विवाहीत जोडपे राहात होते. काही कारणामुळे त्यांच्यात नेहमी भांडणे होत असत. त्या भांडणामुळे त्या बाईला मानसिक व शारीरिक त्रास फार होत असे. ज्या ज्या वेळी अशी भांडणे होत असत त्या त्या वेळी मी त्यांचे भांडण सोडवित असे. दोघांनाही समजावून सांगत असे. असे करताना मी त्या पुरुषावर दबावही टाकायचो.

परंतु हे भांडणाचे प्रकार वारंवार होऊ लागल्याने ते माझ्याही समजावण्याच्या पलिकडे गेले होते. असाच एके दिवशी भांडण व त्यातून मारहाणीचा प्रकार पुन्हा घडला. ती महिला माझ्याकडे मदतीसाठी आली. मी तिला म्हणालो, 'बाई, मी तुम्हाला अशी किती दिवस मदत करू शकणार आहे. त्यासाठी तुम्हालाच खंबीर व्हावे लागणार आहे.'

तिच्या या समस्येवर मात करण्यासाठी मी त्या महिलेला मानसिकदृष्ट्या तयार केले. आणि तिला सांगितले 'तू तुझ्या नवऱ्याची मारहाण किती दिवस सहन करणार आहेस? तुला होत असलेल्या त्रासामुळे तू तुझ्या नवऱ्याचे डोके का फोडू नयेस?'

माझ्या या उद्‌गारामुळे ती संतापली आणि म्हणाली, 'तुमचे म्हणणे बरोबर आहे. माझी चूक नसताना माझा नवरा मला निष्कारणच सतत त्रास देत आहे, याला मीच खंबीरपणे विरोध करायला पाहिजे.' असे म्हणून ती महिला आपल्या घरी गेली.

त्या नंतर सुमारे आठ दिवसाने त्यांच्यात पुन्हा भांडण झाले. नेहमीप्रमाणे नवऱ्याने तिला मारहाण चालू केली. पण त्या महिलेने यावेळी खंबीरपणे त्याला प्रतिकार केला. या घटनेत तिच्या नवऱ्याचे डोके फुटले. त्यावेळी त्या महिलेने तिच्या नवऱ्याला स्वतःहून डॉक्टरकडे नेले. व त्यानंतर ती महिला मला भेटायला आली. घडलेली सर्व हकिकत तिने मला विस्तारपूर्वक सांगितली.

मी तिच्या अंगठ्याचा ठसा एका कोऱ्या कागदावर घेतला. नंतर तो कागद तिच्या नवऱ्याला दाखविला आणि म्हणालो, 'जर तू पुन्हा तुझ्या बायकोला मारहाण केलीस तर लगेच तुला पोलिसांच्या ताब्यात देईल. या गोष्टीचा त्याच्यावर परीणाम झाला आणि बायकोला मारहाण करण्याच्या प्रमाण कमी झाले.

---

## गाव कृती कार्यक्रम

**गाव कृती कार्यक्रमातर्गत 'अस्तित्व समाज विकास संस्था, सांगोला', 'हॅलो मेडिकल फौंऊडेशन, अनदुर' आणि 'युवा ग्राम विकास मंडळ, केज' या तीन भागीदार संस्थांनी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते.**

### युवक मेळावे

हॅलो मेडिकल फौन्डेशन, अनदुर या संस्थेमार्फत बोरगाव, दर्शनाळ व मोटयाल या तीन गावांमध्ये कृती कार्यक्रमातर्गत युवक मेळावे आयोजित केले होते. या मेळाव्यास १२४ युवक सहभागी झाले होते. या मेळाव्याचे विषय हे स्त्री-पुरुष समानतेचे धोरण, युवकांसमोरील आव्हाने व सामाजिक विकास प्रक्रियेत युवकांचा सहभाग असे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नागनाथ कुंभार, प्रा. बिराजदार एन. बी. व प्रा. सचिन कंदाले हे उपस्थित होते. या मेळाव्यास युवकांचा प्रचंड व उत्स्फुर्त सहभाग लाभला.

महात्मा बसवेश्वरांचे विचार काय आहेत. सामाजिक विकास कार्यात युवकांचा सहभाग का महत्वाचा आहे व युवक यात कशा पद्धतीने योगदान देऊ शकतात. एकविसाव्या शतकामध्ये युवकासमोरील विविध आव्हाने कोणती आहेत व त्याचा सामना करण्यासाठी आवश्यक असणारे धैर्य, पाहुण्यांनी युवकांना पटवून दिलं.

युवक मेळाव्याबरोबरच हॅलोच्या कुटुंब मेळाव्यांनाही पुरुष, महिला व युवकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. या मेळाव्यात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवर गावातील लोकांमध्ये चर्चा होत आहेत.

### युवक क्रिकेट स्पर्धा

युवा ग्राम विकास मंडळ, केज, या संस्थेद्वारे युवकांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या क्रिकेट स्पर्धेचा उद्देश प्रत्येक गावातील युवकांना प्रकल्पात सहभाग व सहकार्य वाढविणे व युवकांचे मनोरंजन हा होता.

ही स्पर्धा माळेगाव येथे पार पडली. या स्पर्धेसाठी प्रत्येक गावातून दोन युवक सहभागी झाले होते. तसेच माळेगावातील दोन्ही गटाचे सदस्य, गावचे सरपंच, ग्राम पंचायत सदस्य व इतर गावकरीही उपस्थित होते. या स्पर्धेला युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग सहकार्य लाभले. स्पर्धेच्या विजेत्या संघाला आर्थिक स्वरूपात काही रक्कम बक्षिस म्हणून देण्यात आली.

या क्रिकेट स्पर्धेमुळे युवकांच्यात प्रकल्पाबाबत आपलेपणाची भावना वाढू लागली असून प्रत्येक गावातून युवकांकडून अशा स्पर्धांची मागणी होऊ लागली आहे. तसेच या स्पर्धेमुळे प्रकल्पाचे गावामध्ये अस्तित्व निर्माण झाले आहे.

## रक्त तपासणी शिबिर

अस्तित्व समाज विकास संस्था, सांगोला या भागीदार संस्थेने गट सदस्यांच्या परिवारातील महिलांचे रक्तातील हिमोग्लोबिन चाचणी बुद्धेहाळ या गावात घेतली. तसेच मुलींना जन्म देणाऱ्या गावातील दोन जोडप्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते केला. तसेच हिमोग्लोबीनची चाचणी करणाऱ्या महिलांना हिमोग्लोबीनचे रक्तातील महत्त्व यावर ही मार्गदर्शन करण्यात आले. एकूण २७ महिलांनी चाचणी करून घेतली.



अस्तित्व समाज विकास संस्था, सांगोला यांचे तर्फे घेण्यात आलेले हिमोग्लोबीन तपासणी शिबिर

चाचणीच्या अहवालावरून असे दिसून आले की एकाही महिलेचं हिमोग्लोबीनचं प्रमाण समाधानकारक नव्हतं. या महिलांना हिमोग्लोबीनचं प्रमाण वाढवण्यासाठी कोणता आहार घ्यावा याचं मार्गदर्शन केलं गेलं. त्याचबरोबरो एक महिन्यानंतर याच महिलांची पुन्हा एकदा हिमोग्लोबीनची चाचणी केली जाणार आहे. ज्यामुळे महिनाभरात महिलांच्या रक्तातील हिमोग्लोबीनच्या प्रमाणात वाढ झाली किंवा नाही हेही अस्तित्व समाज विकास संस्थेद्वारे पडताळून पाहिले जाईल.

### गावपातळीवरील कार्यकर्ते

**अस्तित्व संस्था, सांगोला :**

आबासाहेब देवकाते – कितबिसरी, मोहन घोडके – पाचेगाव,
सदाशिव सकनर – काळुबाळूवाडी, संभाजी कवाडे – कोळवाडी
बाळासाहेब अलदार – गौडवाडी, विजय लवटे – बुद्धेहाळ
कुंडलीक कराड – कराडेवाडी, महादेव भजबळकर – तिप्पेहळ्ळी
दत्तात्रय विटेकर – सोनेवाडी, पवन गाडे – जुजारपूर
भाऊसाहेब मेटकरी – हलदहिवडी, भैरू डोसले – हटकर मंगेवाडी
भीमराव खांडेकर – हनमंतगाव, धनराज लवटे – निजामपूर
प्रमोद काळे – गळवेवाडी, बाबुराव भजावळे – मानेगाव
कामदेव इनडे – सावे, नसीर मुल्ला – मांजरी
नितीन वाघमारे – सोनेवाडी, बाळासाहेब बेहरे – चिंचोली
औदुंबर माळी –मेथवडे, सिद्राम मोहरे – सोनलवाडी
संभाजी शिंदे – बागलवाडी, सचीन भुसे – देवकतेवाडी
प्रवीण सुर्यगण – चिंचेवाडी



गाव कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून पाणपोईचे उद्घाटन, अस्तित्व संस्था, सांगोला



संसाधन साहित्याची गाव कार्यकर्त्यांसोबत पूर्व चाचणी, नारी समता मंच, पुणे



चालता बोलता टॉक शो – नारी समता मंच, पुणे



जागतिक महिला हिंसाविरोधी पंधरवडा निमित्त हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर द्वारे जनजागृती अभियान